मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चिंचवडगावात निवडणूक विभागाकडूनच आचारसंहितेचे उल्लंघन..

## निवडणूक विभागावरच थेट पोलिसांनी खटला दाखल करावा : शिवसेनेच्या संतोष सौंदणकरांची मागणी...

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवडगावातील मतदान केंद्राच्या अगदी जवळच असणाऱ्या भाजपच्या जाहिरातीमुळे निवडणूक विभागाच्या पारदर्शक कारभाराचा नमुना पुन्हा एकदा समोर आला आहे. त्यामुळे निवडणूक आयोग अजूनही धृतराष्ट्राच्याच भूमिकेत असण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. मतदानाच्या दिवशीच हा प्रकार निदर्शनास आल्यामुळे निवडणूक विभागाकडून आचारसंहितेचा भंग झाला आहे. त्यामुळे निवडणूक विभागावर पोलिसांनी थेट खटला दाखल करावा, अशी मागणी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे चिंचवडचे शहर संघटक संतोष सौंदणकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.




पत्रकात सौदणकर यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील प्रचारतोफा सोमवारी सायंकाळी थंडावल्या. त्यानंतर आज बुधवारी (दि. २०) रोजी पिंपरी, चिंचवड, भोसरी मतदार संघात मतदान प्रक्रिया पार पडली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या जाहिराती चौकाचौकांत आणि महत्त्वाच्या रस्त्यावर लावण्यात आल्या होत्या. प्रचाराची मुदत संपल्यानंतर त्या उमेदवाराने स्वखर्चाने काढून घ्यायच्या असतात. अथवा महापलिका आणि निवडणूक आयोगाने त्यावर कारवाई करायची असते. परंतु, चिंचवड विधानसभा मतदार संघातील चिंचवड गावातील पवनानगर येथील जैन फत्तेचंद शाळा येथील मतदान केंद्राच्या आवारातच भाजपची भिंतीवर रंगवलेली जाहिरात याला अपवाद ठरली आहे.

पवनानगर येथील जैन फत्तेचंद शाळा हे मतदान केंद्र पोलिसांच्या हद्दीपासून शंभर मीटर अंतरावर आहे. त्यापासून केवळ पन्नास मीटर आत असणाऱ्या एका भिंतीवर भाजपची ही जाहिरात रंगविण्यात आली आहे.

> "राज्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी सोमवार, दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ६ वाजल्यापासून शांतता कालावधी सुरू झाला आहे. मतदान संपेपर्यंतच्या ४८ तासांमध्ये, लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ च्या कलम १२६ अंतर्गत मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या प्रचारास मनाई आहे. या अटींचे उल्लंघन झाल्यास दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास अथवा दंड अथवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद आहे. मग ही कारवाई स्वतःवरच करायची की जाहिरात रंगविणाऱ्या पक्षावर करायची? याचा फैसला खुद्द निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी करावा."
>
> **- मा. संतोष सौंदणकर, चिंचवड शहर संघटक - शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष.**

त्यावर भाजपचे निवडणूक चिन्ह आणि 'पुन्हा एकदा भाजपा सरकार' असा मजकूर रंगविण्यात आला आहे. इतर पक्षांच्या जाहिराती तत्परतेने हटविणाऱ्या निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांना ही जाहिरात कशी दिसली नाही. मुळात भाजपचे बूथ केंद्र जाहिरातीच्या अगदीच जवळ आहे. त्यामुळे आचारसंहितेचा भंग झाला आहे. निवडणूक विभागाने जाणूनबुजून या बाबीकडे दुर्लक्ष केले? त्यामुळे पोलिसांनीच निवडणूक आयोगाच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, असे या पत्रकात संतोष सौंदणकर यांनी म्हटले आहे.



# निवडणूक निकालापूर्वीच चिंचवडमध्ये विजयाचे लागले बॅनर

## भाजपच्या उमेदवाराचे विजयाचे लागले फलक; कार्यकर्त्यांचा उत्साह

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघात निकालापूर्वीच महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या विजयाचे फलक झळकले आहेत. पिंपळे गुरव परिसरातील सुदर्शन नगर येथील चौकात राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी नगरसेविका सुषमा तनपुरे यांनी शंकर जगताप यांच्या विजयानिमित्त अभिनंदनचा फलक लावला आहे.



चिंचवड विधानसभा मतदारसंघात महायुतीचे शंकर जगताप आणि महाविकास आघाडीचे राहुल कलाटे यांच्यात थेट लढत झाली आहे. बुधवारी (दि.२०) रोजी मतदान पार पडले, निवडणूक निकाल शनिवारी (दि.२३) लागणार आहे.

मतदान प्रक्रिया संपताच महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या माजी नगरसेविका सुषमा तनपुरे यांनी सुदर्शन नगर चौकात "नव्या पर्वाचं कणखर नेतृत्व.. शंकरभाऊ जगताप यांची चिंचवड विधानसभा आमदारपदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन" अशा आशयाचा फलक लावला आहे.

आता शनिवार (दिनांक २३) रोजी मतदानाचा निकाल लागणार आहे. त्यानंतरच नेमकं या निवडणुकीत कोण बाजी मारणार हे स्पष्ट होणार आहे. परंतु निकालापूर्वीच लावण्यात आलेल्या या फलकाची चर्चा सध्या मतदारसंघात सुरू झाली आहे.

# विजयाचा गुलाल आम्हीच उधळणार अण्णा बनसोडे यांचा दावा

## पिंपरी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभा मतदारसंघात विजयाचा गुलाल आम्हीच उधळणार असा दावा पिंपरी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी केला आहे.



२०१९-२४ या पाच वर्षांत केलेल्या कामाच्या जोरावर जनतेने टाकलेला विश्वास आमच्या विजयासाठी महत्त्वपूर्ण आहे. महायुती सरकारने केलेली विकासकामे, लाडकी बहीण योजना तसेच जनकल्याणकारी विविध योजना यामुळे मतदारांना दिलासा मिळाला. शहरातील मेट्रोचा निगडी पर्यंतचा विस्तार याच बरोबर मनपाचे विविध प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प यामधून सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला. मतदारसंघातील झोपडपट्टी तसेच मध्यमवर्गीय व सोसायट्यांमधील नागरिकांशी मी वैयक्तिक संपर्कात आहे. त्यामुळे त्यांच्या समस्या, प्रश्न सोडविण्यावर माझा भर असतो. प्रत्येक घटक तसेच सर्वसामान्य मतदारांचा माझ्यावर विश्वास आहे. मी सामान्य जनतेची केलेली कामे अशा विविध कारणामुळे विजय आमचा आहे, त्यामुळे गुलाल आम्हीच उधळणार आहोत असे आमदार अण्णा बनसोडे यांनी म्हटले आहे.

# श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टचे बक्षिस वितरण

## राज्यस्तरीय किल्ले बनवा स्पर्धा 2024 चा बक्षिस वितरण रविवारी पार पडला. या स्पर्धेत तब्बल 85 स्पर्धकांनी सहभाग घेतला.

**पुणे | प्रतिनिधी**

हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट आयोजित राज्यस्तरीय किल्ले बनवा स्पर्धा 2024 चा बक्षिस वितरण रविवारी पार पडला. या स्पर्धेत तब्बल ८५ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट आयोजित राज्यस्तरीय किल्ले बनवा स्पर्धा 2024 चा बक्षिस वितरण रविवारी पार पडला. या स्पर्धेत तब्बल ८५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत स्वराज्य दौलत दुर्गानाथ प्रतिष्ठान साकारलेल्या पुरंदर घेरा हा देखावा सर्वोत्कृष्ट ठरला.

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टच्यावतीने राज्य स्तरीय ऑनलाईन किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ रविवारी श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंदिरात पार पडला. ज्येष्ठ इतिहास संशोधक व दुर्ग अभ्यासक पांडूरंग बलकवडे आणि एच व्ही देसाई कॉलेजचे विभाग प्रमुख गणेश राऊत हे प्रमुख म्हणून उपस्थित होते.

या स्पर्धेतील विजेत्यांसाठी पहिल्या क्रमांकाला ९ हजार, द्वितीय क्रमांकासाठी ७ हजार आणि तृतीय क्रमांकासाठी ५ हजारांचे बक्षिस ठेवण्यात आले होते. त्यात मुंबई विभागात आयुष पाटील हे प्रथम क्रमांकाचे विजेते ठरले. यांनी त्यांनी सुवर्णदुर्ग साकारला होता. तर द्वितीय क्रमांक ओमकार मित्र मंडळ - सरस भेड दुर्ग देखाव्याला मिळाले. तर तृतीय क्रमांक घरकूल मित्र मंडळ यांनी साकारलेल्या प्रतापगड दुर्गाला मिळाले.

कोकण विभागात आदर्श मित्र मंडळाने साकारलेल्या वेल्बोर - साजरा - भोजर यांना प्रथम क्रमांक, तर द्वितीय क्रमांक किल्ले रायगड साकारलेल्या अष्टप्रधान मंडळाला मिळाले.

पश्चिम महाराष्ट्र विभागातून प्रथम क्रमांक सांगलीच्या स्वराज्य दौलत दुर्गनाथ प्रतिष्ठानने साकारलेल्या पुरंदर वज्रगड पुरंदर घेरा पुरंदरच्या देख्याव्याला तर सिंहगड हलता देखावा करणाऱ्या पुण्याच्या मिरजकर परिवाराला द्वितीय आणि किल्ले अहिवंतगड आणि किल्ले मार्कड्याचा देखावा करणाऱ्या सांगलीच्या विजेता तरुण मंडळाला तृतीय क्रमांक मिळाला. वेद इनामदार या लहान मुलाने साकारलेल्या मल्हारगडला आणि महिलांनी साकारलेल्या स्वयंभू गर्जनाच्या- रायगडच्या देखाव्याला उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले. मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक असे उत्तेजनार्थ बक्षिसाचे स्वरूप होते.



### पुरंदर घेरा ठरला सर्वोत्कृष्ट किल्ला

» स्वराज्य दौलत दुर्गानाथ प्रतिष्ठान साकारलेल्या पुरंदर घेरा यांनी 11 किल्ले एकत्र एकूण जो देखावा सादर केलेला देखावा सर्वोत्कृष्ट ठरला. त्यास ११ हजार रुपयांचे बक्षीस होते. तर वेद इनामदार या लहान मुलाने साकारलेल्या मल्हारगडला आणि महिलांनी साकारलेल्या स्वयंभू गर्जनाच्या- रायगडच्या देखाव्याला उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले. मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक असे उत्तेजनार्थ बक्षिसाचे स्वरूप होते.

# वाढलेले मतदान कोणाला फायद्याचे?

## वडगावशेरी विधानसभा मतदान संघात वाढलेले यंदाच्या निवडणुकीत 55.71 एवढे मतदान झाले

**पिंपरी | प्रतिनिधी**

वडगावशेरी विधानसभा मतदान संघात वाढलेले नवमतदारांच्या संख्येमुळे यंदाच्या निवडणुकीत 55.71 एवढे मतदान झाले आहे. मागील निवडणुकीच्या तुलनेत यंदाच्या तुलनेत मतदानाची टक्केवारी 11 टक्क्यांनी वाढली आहे.

सर्वच ४४८ मतदान केंद्रांवर बेव कास्टिंगद्वारे सीसीटीव्हीच्या माध्यमातून वॉच होता. व्हिडिओ चित्रीकरणही करण्यात आले. मतदार संघात ५ लाख ३ हजार ५३९ मतदार आहेत. यात पुरुष-२ लाख ५९ हजार ४५३, महिल-२ लाख ४३ हजार ९८४, ट्रान्सजेंडर मतदार १०२ आहेत. सन २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा ४६ हजार ५४१ मतदार वाढले आहेत. येथे २०१९ मध्ये ४६.९७ टक्के मतदान झाले होते.

मतदार संघात सकाळी ७ ते दुपारी १ या वेळेत टप्प्या-टप्प्याने बहुसंख्य मतदान केंद्रांवर मतदारांचा रांगा होत्या. त्यानंतर दुपारी १ ते ४ या वेळेत गर्दी कमी होती. सायंकाळी ४ ते ६ या वेळेत मतदारांच्या रांगा पुन्हा वाढल्या. प्रामुख्याने झोपडपट्टी भागांतील मतदान केंद्रांवर दिवसभरच गर्दी होती. वडगावशेरी, चंदननगर,



खराडी, विमाननगर, मुंढवा, कल्याणीनगर, वाघोलीचा काही भाग, लोहगाव, साठेवस्ती या भागांत उत्स्फूर्त मतदान झाल्याचे दिसून आले.

धानोरी येथील नारायण गेनबा मोझे शाळा, न्युरान लॅब्स स्कूल, कै.बाबुराव माधवराव टिंगरे विद्यालय, भैरवनगरमधील कै. वसंतराव आनंदराव टिंगरे विद्यालय, विश्रांतवाडी येथील विठ्ठलराव गाडगीळ विद्यालय, जनता हायस्कूल, कस्तुरबा हौसिंग सोसायटी, कळस येथील सिताराम देवकर शाळा, दी ट्रीनीटी स्कूल, टिंगरेनगर येथील कै. गेनबा सोपान मोझे विद्यालय, सरस्वती विद्यालय, पुणे इंटरनॅशनल स्कूल, येरवडा येथील गेनबा सोपानराव मोझे शाळा.

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण शाळा, नेताजी सुभाषचंद्र भोस, फुलेनगर येथील रश्मी स्कूल, अग्रसेन शाळा, रामवाडी येथील सुभेदार रामजी मालोजी आंबेडकर माध्यमिक विद्यालय, चंदननगरमधील श्री. संत तुकाराम माध्यमिक विद्यालय, कै. हंबीरराव कृष्णराव मोझे विद्यालय, खराडी येथील सुंदरबाई मराठे विद्यालय या केंद्रांवर मतदारांची गर्दी सायंकाळपर्यंत होती. काही केंद्रांवर आकर्षक रांगोळ्या काढत सजावटही करण्यात आली होती. सखी मतदान केंद्रही उभारण्यात आले होते. मतदारांच्या लहान मुलांसाठी पाळणाघराची व्यवस्था होती. वैद्यकीय सुविधाही उभारण्यात आल्या होत्या.

# नावे गायब असल्याने अनेकांचा हिरमोड

## यादीतून नावे गायब आणि बोगस मतदानाच्या तक्रारी करण्यात आल्या.

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला मतदारसंघात मतदानासाठी सकाळी ७ वाजेपासून सकाळपासूनच नागरिकांची गर्दी पाहायला मिळाली. मात्र, यादीतून नावे गायब आणि बोगस मतदानाच्या तक्रारी करण्यात आल्या. यामुळे मतदान करण्यासाठी आलेल्या अनेकांचा हिरमोड झाला. तर, मृत व्यक्तींची नावे मतदारयादीत असल्याच्या तक्रारी मांडण्यात येत होत्या.

खडकवासला मतदारसंघात धनकवडी, नऱ्हे, वडगाव, धायरी, नांदेड परिसरात मतदारांसाठी सुविधा केंद्र, तंत्रज्ञानाचा वापर, योग्य नियोजनामुळे मतदान प्रक्रियेला गती दिसून आली. सकाळच्या सत्रात ज्येष्ठ नागरिक, मॉर्निंग वॉकसाठी बाहेर निघालेले नागरिक मोठ्या संख्येने मतदानासाठी हजर झाले.

तसेच नवमतदारांचा



उत्साह दिसून येत होता. मात्र, अनेक ठिकाणी लोकसभेला मतदान केले, मात्र विधानसभेला मतदार यादीत नावच नाही असे प्रकार घडल्याचे दिसून आले. अनेकांना मतदान न करताच परतावे लागले. तर काही नवमतदारांची यादीत नावे नव्हते. त्यामुळे त्यांचाही निरुत्साह झाला.

संभाजी ब्रिगेडचे प्रवेश प्रक्त्ता संतोष शिंदे हे सपत्नीक मतदानाला आले होते. धनकवडीतील प्रियदर्शनी विद्यामंदिर व प्राथमिक विद्यालयात ते मतदानासाठी आले. पण, त्यांच्या नावावर आधीच मतदान झाल्याचे सांगण्यात आले. शिंदे यांनी अधिकाऱ्यांना विचारणा केली असता, त्यांनी “मतदान करुन गेलेला माणूस तुमच्यासारखाच आणि आमच्या यादीतील तुमच्या छायाचित्रासारखाच दिसत होता,’ असे सांगितले. यामुळे शिंदे यांचा पार चढला. याबाबत दैनिक “प्रभात’शी बोलताना त्यांनी सांगितले की, “माझ्या मताची चोरी झालेली आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. यामुळे बोगस मतदान झाल्याचे निर्दशनास येत आहे.’

# शनिवारी तळेगावमधील वाहतूकीमध्ये बदल

## शनिवारी तळेगावमध्ये विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होणार, गैरसोयी टाळण्यासाठी वाहन चालकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

शनिवारी तळेगावमध्ये विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होणार आहे. त्यामुळे शनिवारी (दि. २३) तळेगाव येथील वाहतूकीमध्ये काही बदल करण्यात आले आहे. गैरसोयी टाळण्यासाठी वाहन चालकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा, असे आवाहन वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी केले आहे.

मुंबईकडून तळेगाव चाकण रोडने एचपी चौकाकडे जाणा-या जड व अवजड वाहतुकीस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – या मार्गावरील वाहने वडगाव फाटा एमआयडीसी रोड मार्गे वडगाव कमान (डावीकडे वळून) तळेगाव नवलाख उंब्रे बधलवाडी भामचंद्र डोंगर आंबेठाण एचपी चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

मुंबईकडून चाकणच्या दिशेने जाणा-या हलक्या वाहनांना व दुचाकीस वडगाव फाटा ते इंद्रायणी कॉलेज पर्यंतचे मार्गावर बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – या मार्गावरील वाहने वडगाव फाटा निलया सोसायटी कार्नर (डावी कडे वळून) मंत्रा सिटी रोड मार्गे बीएसएनएल कॉर्नर (उजवीकडे वळून) सीटी कार्नर (डावीकडे वळून) हिंदमाता भुयारी मार्ग येथे उजवीकडे वळून चाकण बाजुकडे जातील. काका हलवाई स्वीट मार्ट / शांताई जनसेवा वाचनालय इंद्रायणी कॉलेज

चाकण एचपी चौकाकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या जड व अवजड वाहतुकीस चाकण तळेगाव रोडवर बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – या मार्गावरील वाहने एचपी चौक आंबेठाण भामचंद्र डोंगर नवलाख उंब्रे तळेगाव एमआयडीसी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

बधलवाडी चाकण कडून मुंबईच्या दिशेने जाणा-या हलक्या वाहनांना व दुचाकींना इंद्रायणी कॉलेज तळेगाव ते वडगाव फाटया पर्यंतच्या रोडवर बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – या मार्गावरील वाहने जनसेवा वाचनालय इंद्रायणी कॉलेज येथे (डावीकडे वळून) हिंदमाता भुयारी मार्ग शांताई सीटी कार्नर (उजवीकडे वळून) बीएसएनएल कॉर्नर (डावीकडे वळून) मंत्रासिटी रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.



### महायुतीच्या कार्यकर्त्यांना येथे पार्किंग

» मतमोजणीच्या दिवशी महायुतीचे उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते यांना वडगाव फाटा ते स्वराज नगरी मार्गे येवून माउंट सेंट ॲन स्कुल तळेगाव चाकण रोड तळेगाव या शाळेच्या पार्कीगमध्ये थांबण्याची व मैदानामध्ये पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

### बापूसाहेब भेगडे यांच्या कार्यकर्त्यांसाठी येथे पार्किंग

» मतमोजणीच्या दिवशी अपक्ष उमेदवार बापुसाहेब जयवंतराव भेगडे व त्यांचे कार्यकर्ते तळेगाव स्टेशन चौकातून हरणेश्वर सोसायटी मार्गे येवून वाघळे पार्क, हरणेश्वर सोसायटी, येथील अंतर्गत रोड लगत तसेच भारत पेट्रोल पंप ते ईगल कार्नर पर्यंत सर्व्हिस रोडवर पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच कार्यकर्त्यांना थांबण्याकरीता नुतन पॉलेटेक्निल कॉलेजच्या कमानीचे उजव्या बाजूला व्यवस्था करण्यात आली आहे.

### इतर अपक्ष उमेदवारांसाठी येथे पार्किंग

» इतर अपक्ष उमेदवार यांच्या कार्यकर्त्याकरीता दुय्यम निबंधक कार्यालया समोरील अंतर्गत रोड लगत पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

# वारकऱ्यांच्या स्वागताची देहू नगरीत जय्यत तयारी

## उत्पत्ति एकादशी आणि आळंदी यात्रेच्या पार्श्वभूमीवर विशेष नियोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुढील आठवड्यात मंगळवारी (दि.२६) असलेल्या उत्पत्ति एकादशी आणि आळंदी यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र देहू नगरीत वारकरी बंधू-भगिनींचे स्वागत करण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि देवस्थान समितीकडून नियोजन करण्यात आले आहे. सोमवारी (दि.१८) मुख्याधिकारी निवेदिता घार्गे यांच्या अध्यक्षतेखाली नगरपंचायतीत यासंबंधी विशेष बैठक पार पडली. त्यानंतर पोलीस प्रशासनासोबत संस्थानच्या विश्वस्तांची बैठक संपन्न झाली. संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा आणि कार्तिकी एकादशीच्या पार्श्वभूमीवर देहूगावात येणाऱ्या भाविकांची सुरक्षितता, सोयीसुविधा यांबाबत नियोजन करण्यात आले.

संजीवन समाधी सोहळा आणि कार्तिकी एकादशीच्या अनुषंगाने संस्थानच्या कार्यालयात मंगळवारी (दि.१९) परिमंडल २ चे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी आढावा बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी यात्रा काळात येणाऱ्या वारकऱ्यांची सोयीसुविधा व सुरक्षितता व परिसरातील मांस विक्री व अवैध धंदे यात्रा काळात बंद करण्याची मागणी श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने पोलीस प्रशासनाकडे करण्यात आली.



### स्वच्छता, वीज, आरोग्य आदीचे नियोजन

» कार्तिक एकादशीला श्री संत तुकाराम महाराजांचे दर्शन घेण्यासाठी राज्यभरातून वारकरी भाविक देहूत येतात. या भाविकांची सुरक्षितता आणि त्यांना मिळणाऱ्या सोयीसुविधा यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. इंद्रायणी नदी घाट परिसर स्वच्छता, अंतर्गत रस्ते स्वच्छता, डासांपासून सुटकेसाठी औषध फवारणी, धूर फवारणी, मंदिर परिसर स्वच्छ करणे, बंद पथदिवे सुरू करणे, सीसीटीव्ही कॅमेरे सज्ज करणे, दर्शनार्थ रांगेचे नियोजन, मुक्कामी दिंड्यांना शासकीय, निमशासकीय शाळा, कार्यालय उपलब्ध करुन देणे, पाणी टँकर पुरवठा, शौचालय उभारणे, औषधसाठा उपलब्ध करणे, रुग्णवाहिका, अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे आदीचे नियोजन करण्यात आले आहे.

### यात्रा काळात मांस विक्री बंदीची मागणी

» मुख्य मंदिर आणि घाट परिसर स्वच्छता तसेच मुख्य मंदिर परिसरामध्ये वाहने उभी करण्यास बंदी करावी, वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी मुख्य चौक, प्रवेशद्वार आणि रस्त्यांवरील अतिक्रमण हटविणे, वारकरी भाविकांना पदपथावरून चालता यावे यासाठी अतिक्रमण काढण्यात यावीत, परिसरामध्ये सुरू असलेले अवैध धंदे आणि मांस विक्री यात्रा काळात बंद ठेवावेत व संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी संस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

> देहूत येणारे भाविक, वारकरी यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. संस्थानने मांडलेल्या सूचनांची संबंधित विभागाला माहिती देऊन त्यावर कारवाई केली जाइल. या व्यतिरिक्त आणखीन काही सूचना असल्यास त्यावर देखील त्वरित कार्यवाही करण्यात येईल.
>
> - विशाल गायकवाड, पोलीस उपायुक्त

# विद्यार्थ्यांच्या 'अपार' आयडीवरील पत्त्यांवरून पालकांमध्ये संभ्रम

## पत्ता बदलता येणार नाही, गोपनीयतेच्या इशाऱ्याने वाढला संशय

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या महत्त्वकांक्षी उपक्रमातील एक म्हणजे वन स्टुडंट वन आयडी कार्ड. सर्व विद्यार्थ्यांचा 'अपार आयडी' तयार करण्याच्या सूचनांवरून सध्या पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. यामध्ये अपार कार्ड बनल्यानंतर रहिवासी पत्त्यात बदल करता येणार नाही आणि पालकांच्या माहितीबद्दल गोपनीयता राहणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे. या इशाऱ्यानेच पालकांचा संशय वाढविला आहे.




### पालकांच्या मनात सवाल

» तीन पाटील, पालक प्रतिनिधी म्हणाले, "पालकांना संदेशानुसार अपार आयडी बनल्यानंतर त्यात कोणताही बदल केला जाणार नाही. विद्यार्थ्यांचे नाव, पालकांचे नाव, रहिवासी पत्ता आदीमध्ये कोणताही बदल भविष्यात करता येणार नाही. नाव बदलणार नाही, हे ठिक आहे, पण पत्ताच बदलता येणार नाही, या सूचनेने पालकांची चिंता वाढली आहे. अनेक पालक रोजगार किंवा नोकरीच्या कारणाने वेगळ्या शहरात भाड्याच्या घरात राहतात. त्यांच्या आधार कार्डवर त्याच घराचा पत्ता असतो. पालकांची बदली झाल्यानंतर किंवा घर बदलल्यानंतर त्यानुसार आधार कार्ड अपडेट करावा लागतो. त्यामुळे पत्ता कायमस्वरूपी कसा राहील, असा सवाल पालकांच्या मनात आहे.

केंद्र सरकारच्या महत्त्वकांक्षी उपक्रमातील एक म्हणजे वन स्टुडंट वन आयडी कार्ड. सर्व विद्यार्थ्यांचा 'अपार आयडी' तयार करण्याच्या सूचनांवरून सध्या पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. यामध्ये अपार कार्ड बनल्यानंतर रहिवासी पत्त्यात बदल करता येणार नाही आणि पालकांच्या माहितीबद्दल गोपनीयता राहणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे. या इशाऱ्यानेच पालकांचा संशय वाढविला आहे.

विद्यार्थ्यांसाठी 'अपार आयडी' तयार करायची असल्याचा संदेश शाळांकडून पालकांच्या मोबाईलमध्ये पडला आहे. त्यानुसार या आयडीमुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आपली सर्व कागदपत्रे सांभाळून ठेवता येतील, असे सांगण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचा हा आयडी बनवण्याकरिता आई आणि वडील अशा दोन्ही पालकांचे आधार कार्ड शाळेत सादर करणे अनिवार्य असल्याची सूचना आहे. हा केंद्र शासनाचा प्रकल्प असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र त्यापुढे दिलेल्या इशाऱ्याने पालक संभ्रमात पडले आहेत.

यातील दुसरा इशारा गोपनीयतेशी संबंधित आहे. पालकांची आधार कार्डबद्दलची माहिती गोपनीय राहणार नाही, अशी शक्यता असल्याचे संदेशात म्हटले आहे. यासाठी पालकांची संमती अनिवार्य आहे. त्यानुसार सोबत पाठवलेल्या फॉर्ममध्ये अपार आयडीचे संमती पत्र दिलेले आहे. त्यातील एक प्रत पालकांनी प्रिंट काढून भरावी व संमतीपत्र भरावे, अशी सूचना करण्यात आली आहे. माहिती गोपनीय राहणार नसल्याचा इशारा दिल्याने पालकांमध्ये संशय निर्माण झाला आहे. अनेक पालकांनी याबाबत शाळांकडे विचारणा केली असून शिक्षकांकडे याचे समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचे सांगण्यात येत आहे. सरकार किंवा शालेय शिक्षण विभागाने याबाबत खुलासा करावा, अशी मागणी पालकांनी केली आहे.

नाव न छापण्याच्या अटीवर एक शिक्षणाधिकारी म्हणाले,"अपार आयडी ही सुरुवात आहे. यावर पुढे आक्षेप आल्यास पत्त्याबाबत नव्याने बदल करता येईल. हा केंद्र सरकारचा प्रकल्प आहे. त्यानुसार विद्यार्थी पुढे उच्च शिक्षणाला गेल्यास त्याचा संपूर्ण पूर्व शैक्षणिक इतिहास एका क्लिकवर पाहता येईल. त्यानुसार गोपनीयतेच्या सूचनेबाबतही काळजी करण्यासारखे काही नाही."

# वडगाव शेरी स्व. गोपीनाथ मुंडे जलतरण तलावात राडारोडा

## पालिकेच्या वतीने वडगाव शेरी भागातील नागरिकांच्या सोयीनुसार जलतरण तलावासाठी तीन कोटी रुपयांचे बजेट मंजूर झाले होते.

**पुणे | प्रतिनिधी**

पालिकेच्या वतीने वडगाव शेरी भागातील नागरिकांच्या सोयीनुसार जलतरण तलावासाठी तीन कोटी रुपयांचे बजेट मंजूर झाले होते. त्यातून येथील जलतरण तलावाचे काम अर्धवट अवस्थेत आहे. तलावाच्या आवारात सर्रासपणे राडारोडा टाकण्याचे काम करण्यात येत आहे. हा जलतरण तलाव आहे की, राडारोड्याचे आगार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. या कामासाठी मंजूर करण्यात आलेले बजेट पाण्यात गेले असल्याची म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

जलतरण तलावास लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे असे नामकरण देखील देण्यात आले. मात्र येथील सद्य परिस्थिती अतिशय बिकट असल्याचे पाहायला मिळत आहे. प्रवेशद्वाराच्या आतील व



> गेली पाच वर्षे येथील नागरिकांना जलतरण तलावासाठी प्रतीक्षा करण्याची वेळ येत असेल तर यासारखी शोकांतिका दुसरी कोणती असू शकते?
>
> **- इलियास शेख, सामाजिक कार्यकर्ते**

> जर जलतरण तलावासाठी तीन कोटी रुपयांचे बजेट मंजूर होऊन देखील ते पूर्ण करण्यास अधिकारी असमर्थ ठरत असतील तर अशा अधिकाऱ्यांना खुर्चीवर बसण्याचा अधिकार नाही
>
> **- स्वप्नील माने, सामर्थ्य जनशक्ती संघटना, युवा प्रदेशाध्यक्ष**

### टाकीत पावसाचे पाणी आणि डास

» जलतरण तलावाच्या टाकीचे कामदेखील करण्यात आले आहे, पण ते कामदेखील अर्धवट अवस्थेत राहून त्यामध्ये पावसाचे पाणी साचून राहिल्यामुळे त्यामध्ये शेवाळयुक्त पाणी साचून राहिल्याने परिसरात या पाण्यामुळे डासांचे प्रमाण वाढून नागरिकांना डासांच्या नेहमीच होणाऱ्या त्रासामुळे डेंग्यू, मलेरिया यासारख्या आजारांचा फैलाव परिसरात वाढतो. टाकीजवळ अनेक दारूडे सर्रासपणे दारू पिण्याचा आनंद लुटत असल्यामुळे असलेला परिसर हा तळीरामांचा अड्डाच बनला आहे. पालिका अधिकाऱ्यांची आडकाठी व निष्काळजीपणाचा फटका नागरिकांना सहन करावा लागत आहे. या संदर्भात पालिकेचे जलतरण विभागाचे अभियंता मनोज मेटे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

बाहेरील बाजूस कोणी पालिकेचे साफसफाई कर्मचारी फिरकत नसल्याने नागरिकांना असलेला राडारोडा व कचरा येथील गेटवरच टाकण्याची वेळ येते. शहराचा मुख्य भाग म्हणून वडगाव शेरी भागाकडे प्रामुख्याने पाहिले जाते, पण पंधरा वर्षांपूर्वी हा भाग नव्यानेच मतदारसंघ म्हणून घोषित करण्यात आला आहे. मात्र परिसरात वाढत्या सिमेंटच्या जंगलामुळे परिसरातील नाले, विहिरी नष्ट झाल्याचे चित्र परिसरात पाहायला मिळत आहे. पण पालिकेच्या निष्काळजीपणामुळे या भागात जलतरण तलावच नव्हता. नागरिकांना नाईलाजास्तव खराडी अथवा येरवडा भागातील जलतरण तलावाकडे पोहोण्यास जाण्याची वेळ येत होती.